जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 OCT 2017
तरुण भारत

# संशोधकांनी गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न करण्याची गरज

## चितळे डेअरीचे कार्यकारी संचालक गिरीष चितळे यांचे प्रतिपादन: कार्यक्रमास मान्यवरांची उपस्थिती

प्रतिनिधी
कोल्हापूर

देशामध्ये बारा ते पंधरा टक्के वाटा हा अन्न प्रक्रिया उद्योगाचा असल्याने या क्षेत्रात तरुणांना अनेक प्रकारच्या संधी निर्माण झालेल्या आहेत. संशोधक विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा उपयोग करुन मालाच्या किंमती कमी करणे व गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करीत राहण्याची आवश्यकता आहे. तंत्रज्ञानाच्या सहाय्याने स्थानिक पदार्थांचे जागतिक पातळीवर मार्केटींग करण्यासाठी विद्यार्थ्यांनी संशोधनात्मक प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन चितळे डेअरीचे कार्यकारी संचालक गिरीष चितळे यांनी केले.

'वर्ल्ड फूड डे'च्या निमित्ताने शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभाग व सीआयआय यांच्या संयुक्त विद्यमाने 'अन्न प्रक्रीया उद्योगात व्यवसायाची संधी' या विषयावरील चर्चासत्राच्या उद्‌घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सीआयआयच्या दक्षिण महाराष्ट्र झोनचे अध्यक्ष योगेश कुलकर्णी होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'वर्ल्ड फूड डे' निमित्ताने आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना चितळे डेअरीचे कार्यकारी संचालक गिरीष चितळे. सोबत पल्लवी कोरगांवकर, डॉ. जयदीप बागी, डॉ. ए. के. साहू, प्रताप नाईक.**

चितळे म्हणाले, अन्न प्रक्रिया उद्योगामध्ये विविध प्रकारच्या स्वयंचलित उपकरणांची प्रचंड निकड आहे. कडधान्य, पालेभाज्या, फळे हे आपल्याच देशातील लोकसंख्येला पुरत नाहीत. शेतकऱ्यांचे उत्पादन, त्यावरील प्रक्रिया आणि मार्केटिंग यांचा योग्य ताळमेळ जमल्यास या क्षेत्रामधील तरुणांना प्रचंड उभारी मिळेल. जीवन साखळीतील अन्न हा सर्वात महत्वाचा घटक आहे. मानवाला सध्या प्रक्रिया केलेले अन्न लागते कारण आपण निसर्गापासून लांब झालेलो आहोत. उत्तम आरोग्यासाठी प्रक्रिया केलेले अन्न कमी प्रमाणात खावे. आजच्या शेतकऱ्याला इतरांवर अवलंबून राहावे लागते. पूर्वी सत्तर ते ऐंशी टक्के प्रमाणात वेगवेगळ्या प्रकारचे धान्य शेतकरी स्वत: पिकवित होते. भारतातील लोकांच्या खाण्याच्या गरजा बदलत नाहीत, पद्धती बदलत आहेत. मोठी झेप घेण्यासाठी छोटया छोटया गोष्टींमधील गॅप पाहायला हवा. विद्यापीठ आणि उद्योग यांच्या समन्वयाने विद्यार्थ्यांना अद्यावत तंत्रज्ञानाची माहिती उपलब्ध होवू शकते. भारतातील प्रत्येक छोटा व्यापारी आणि उद्योजक हा स्वत:च स्टार्टअप आहे, असेही त्यांनी सांगितले.

पल्लवी कोरगांवकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी, डॉ. ए. के. साहू, प्रताप नाईक, उपकुलसचिव डॉ. जी. एस. कुलकर्णी आणि तंत्रज्ञान अधिविभागातील संशोधक विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

19 OCT 2017

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात 'दृष्टी' चित्रपट प्रदर्शनास प्रतिसाद

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १८ : शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागातर्फे 'दृष्टी' उपक्रमांतर्गत चित्रपट प्रदर्शनास चांगला प्रतिसाद मिळाला. वि. स. खांडेकर सभागृहात त्याचे आयोजन केले होते.

या वेळी 'दक्षिणायन' साहित्य व कला क्षेत्रातील उपक्रमांतर्गत अमोल पालेकर व संध्या गोखले यांनी उपलब्ध करून दिलेले चित्रपट विदेशी भाषा विभागामार्फत प्रदर्शित करण्यात आले. क्लिंट इस्टवूड दिग्दर्शित 'इनव्हिक्टस' हा अमेरिकन-दक्षिण आफ्रिकन चित्रपट दाखविण्यात आला. नेल्सन मंडेला यांनी नवे राष्ट्राध्यक्ष म्हणून सूत्रे हाती घेतल्यानंतर वंशभेदाचा इतिहास असलेल्या दक्षिण आफ्रिकेतील समाजाला एकत्र आणण्यासाठी रग्बी खेळाच्या कप्तानास कसे प्रोत्साहित केले, त्याची ही कहाणी आहे.

तमिळ चित्रपट 'कक्का मुत्ताइ' हा राष्ट्रीय व फिल्मफेअर पुरस्कारप्राप्त चित्रपट प्रदर्शित करण्यात आला. चेन्नईतील एका झोपडपट्टीत राहणारे दोन भाऊ पिझ्झा खाण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी जो संघर्ष करतात, त्याची हृदयस्पर्शी व विनोदी शैलीतील मांडणी असलेली ही कहाणी विद्यार्थ्यांना आवडली. विदेशी भाषा प्रभारी विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे, शीतल कुलकर्णी, प्रियांका माळकर, नितीश घाटगे, जीवन जाधव यांनी उपक्रमासाठी सहकार्य केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
19 OCT 2017
लोकमत

# वन्यजीवांबद्दल विद्यापीठात जागृती

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : वन्यजीव सप्ताहानिमित्त शिवाजी विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागातर्फे विविध उपक्रम राबविण्यात आले. या उपक्रमांच्या माध्यमातून वन्यजीवांबद्दल विद्यार्थ्यांमध्ये जागृती करण्यात आली.

यातील छायाचित्रण कार्यशाळेत मानद जंगलरक्षक रमण कुलकर्णी, वन्यजीव छायाचित्रकार हरिष कुलकणी यांनी विविध माहितीपट व त्यांच्या निर्मितीची प्रक्रिया सांगितली.

यावेळी रमण आणि हरिष कुलकर्णी यांनी बनविलेल्या 'फॅन थ्रोटेड लिझार्ड' व 'राधानगरी : द लँड ऑफ गौर' हे दोन माहितीपट दाखविण्यात आले. यावेळी वन्यजीव छायाचित्रीकरणाबाबत हरिष कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. या कार्यक्रमात पर्यावरण विभागप्रमुख प्रा. डॉ. पी. डी. राऊत यांनी प्रास्ताविक केले. सहायक अधिव्याख्यात्या डॉ. आसावरी जाधव यांनी आभार मानले.